जाहिरात नमुना सन २०२५-२६

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांसाठी खालील तक्त्यात दर्शवल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी पध्दतीने करार तत्त्वावर खालील तक्त्यानुसार पदांसाठी पात्र ठरत असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वय मर्यादा | कामाचे ठिकाण | प्रतिमहा मानधन (रु.) | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भुलतज्ञ | २ | MD/Anesth/DA/DNB | ७० वर्षा पर्यंत | प्रसुतीगृह | रु. ७५०००/- | अ.जा. -१, अ.ज.-१, वि.जा.अ.-१, एसईबीसी-१, इडब्लुएस-१, खुला-१ |
| २ | बालरोग तज्ञ | १ | MD Pead/DCH/DNB | | प्रसुतीगृह | | |
| ३ | सर्जन | १ | MS General Surgery/DNB | | UCHC | | |
| ४ | पॅथॉलॉजिस्ट | १ | MD Pathology/DNB/DPB | | UCHC | | |
| ५ | रेडिओलॉजिस्ट | १ | MD Radiology/DMRD | | UCHC | | |
| ६ | डेंटिस्ट | १ | BDS with २ years exp.or MDS (without exp) | खुला ३८ राखीव ४३ पर्यत | UCHC | रु. ३००००/- | खुला-१ |
| ७ | Physician | १ | MD Medicine/ DNB | ७० वर्षा पर्यंत | प्रा.आ.केंद्र UPHC पॉलिक्लिनीक ओपीडी वेळ ४ तास | To visit once in every week. Rs.2000 to be paid as fixed amount per visit + Rs.100 per patient checked of his/her specialty to maximum Rs. 5000/ visit. | मानसेवी तज्ञ असलेमुळे बिंदु नामावली लागू नाही |
| ८ | Obstetrics & Gynaecologist | १ | MD/MS Gyn/DGO/DNB | | | | |
| ९ | Ophthalmologist | १ | MS Opthalmologist/DOMS | | | | |
| १० | Dermatologist | १ | MD (Skin/VD), DVD, DNB | | | | |
| ११ | पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी NUHM | ७ | M.B.B.S (MCI/MMC कॉन्सिल कडील नोंदणी अनिवार्य) | ७० वर्षा पर्यंत | UPHC/UCHC | रु. ६००००/- | अ.ज.-१, विजाअ-१, भजब-१, भजक-१, इमाव-१, एसईबीसी-२ |

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वय मर्यादा | कामाचे ठिकाण | प्रतिमहा मानधन (रु.) | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी UHWC | ४ | M.B.B.S (MCI/MMC कॉन्सिल कडील नोंदणी अनिवार्य) प्रथम प्राधान्य | ७० वर्षा पर्यंत | आरोग्य मंदिर UHWC | रु. ६००००/- | अ.ज.-२, भजड-१, विमाप्र-१ |
| | | | M.B.B.S उमेदवार न मिळाल्यास B.A.M.S (MCI/MMC कॉन्सिल कडील नोंदणी अनिवार्य) | खुला ३८ राखीव ४३ | आरोग्य मंदिर UHWC | रु.२५०००/- अधिक रुपये रु.१५०००/- (PBI) रु.४००००/- | |
| १३ | अर्धवेळ वैदयकीय अधिकारी | ४ | M.B.B.S (MCI/MMC कॉन्सिल कडील नोंदणी अनिवार्य) | ७० वर्षा पर्यंत | UPHC ओपीडी वेळ ४ तास | रु. ३००००/- | बिंदु नामावली लागू नाही |
| १४ | पब्लिक हेल्थ मॅनेजर | २ | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA Health Care | खुला ३८ राखीव ४३ पर्यंत | NUHM, मुख्यालय | रु. ३५०००/- | अजा-१, खुला-१ |
| १५ | शहर गुणवत्ता आश्वासक समन्वयक | १ | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA Health Care | | NUHM, मुख्यालय | रु. ३५०००/- | खुला-१ |
| १६ | कार्यक्रम सहाय्यक | १ | कोणत्याही शाखेचा पदवीधर, मराठी-३०, इंग्रजी-४० टायपींग | | NUHM, मुख्यालय | रु. १८०००/- | खुला-१ |
| १७ | स्टाफ नर्स UPHC/UCHC | १२ | १२ वी पास, जीएनएम कोर्स, मुंबई नर्सिंग कौन्सिलचे रजिस्ट्रेशन | | UPHC/UCHC | रु. २००००/- | अज-१, इमाव-४, एसईबीसी-३, इडब्लुएस-३, खुला-१ |
| १८ | स्टाफ नर्स UHWC | १२ | १२ वी पास, जीएनएम कोर्स, मुंबई नर्सिंग कौन्सिलचे रजिस्ट्रेशन | | आरोग्य मंदिर UHWC | रु. २००००/- | अज-१, विजाअ-१, भजड-१, विमाप्र-१, इमाव-१, एसईबीसी-३, इडब्लुएस-२, खुला-२ |
| १९ | आरोग्य सेविका (ए.एन.एम.) | २ | ए.एन.एम. कोर्स उत्तीर्ण, मुंबई नर्सिंग कौन्सिलचे रजिस्ट्रेशन | | UPHC | रु. १८०००/- | एसईबीसी-१, इडब्लुएस-१ |
| २० | पुरुष बहुउददेशिय कर्मचारी (Male MPW) | २१ | १२ वी सायंन्स पास व पॅरामेडिकल बेसीक ट्रेनिंग कोर्स किंवा सॅनेटरी इन्सपेक्टर कोर्स | | UHWC | रु. १८०००/- | अज-२, भजब-१, भजड-१, विमाप्र-१, इमाव-५, एसईबीसी-३ इडब्लुएस-३, खुला-५ |

| अ. क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | वय मर्यादा | कामाचे ठिकाण व वेळ | प्रतिमहा मानधन (रु.) | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | फार्मासिस्ट | २ | १२ वी सायन्स पास व B.Pharm/D.Pharm with Registration | खुला ३८ राखीव ४३ पर्यत | UCHC | रु. १७०००/- | एसईबीसी-१, इडब्लुएस-१ |
| २२ | लॅब टेक्निशियन | २ | १२ वी पास, DMLT/ MLT/PGDMLT महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषदेकडे नोंदणी प्रमाणपत्र. | | UCHC | रु. १७०००/- | अजा-१, एसईबीसी-१ |
| २३ | X-Ray टेक्निशियन | १ | १२ वी पास, Diploma in Radiographer & X-Ray महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषदेकडे नोंदणी प्रमाणपत्र. | | UCHC | रु. १७०००/- | खुला-१ |

वरील प्रमाणे रिक्त असलेल्या निव्वळ कंत्राटी पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करणेत येत आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या मुळ प्रती व छायांकित केलेल्या साक्षांकित प्रतीसह उपरोक्त नमुद केलेल्या रिक्त पदांसाठी **अर्ज स्विकारण्याची मुदत दि. १२/०९/२०२५ पासून ते दि. ०३/१०/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासुन ते ०५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) स्विकारण्यात येतील. तसेच दिनांक: ०३/१०/२०२५ नंतर उमेदवारांच्या अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही**. ई-मेलव्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण: - वैदयकीय आरोग्य अधिकारी, आरसीएच कार्यालय, पाण्याच्या टाकीखाली, आपटा पोलिस चौकी शेजारी, उत्तर शिवाजी नगर, सांगली- ४१६४१६**

<u>अटी व शर्ती</u>: -

१. अ) उपरोक्त नमुद केलेले पद ११ महिने २९ दिवस या कालावधीकरता कंत्राटी तत्त्वावर कंत्राटी पध्दतीव्दारे भरणेचे आहे.
   ब) उपरोक्त कंत्राटी पदाकरिता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.
   क) महाराष्ट्र शासनाकडील वार्षिक राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कृती आराखडयामध्ये सदर पदांची मंजुरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा आपोआप संपुष्टात येईल.
   ड) वरील पद वार्षिक कृती आराखडयामध्ये मंजुर झाल्यास व प्रथम नियुक्ती कार्यकाळात समाधानकारक काम असलेस पुढील ११ महिने २९ दिवसांची पुर्ननियुक्ती मिळणेस उमेदवार पात्र राहील.
२. वरील नमुद पदे ही राज्य शासनाची किंवा म.न.पा. आस्थापनेवरील पुर्णवेळ/कायम पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकिय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.
३. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा. याबाबतचे हमी पत्र देण्यात यावे.
४. जाहिरातीमधील सदर रिक्त पदांच्या संख्येत, शैक्षणिक अर्हता, मानधन, वयोमर्यादा, सामाजिक आरक्षण, नियुक्ती ठिकाणामध्ये बदल, नमुद केलेल्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा.आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर

महानगरपालिका, सांगली यांनी राखून ठेवलेला आहे. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत/रिक्त पदांच्या संख्येत वरील नमुद केलेल्या बाबीमध्ये बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.

५. जाहिरातीतील पदांच्या संख्येत बदल होवु शकतो. त्या-त्या वेळेच्या रिक्त पदांच्या संख्येनुसार भरती करण्यात येईल.

६. निवड यादीतील गुणानुक्रमांकाचे आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवारांनी कोणत्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल. उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया हि प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करून गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येवून गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड समितीचा निर्णय अंतीम राहील.

७. गुणांकन यादी तयार केलेनंतर दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवारांचे गुणांकन व वय देखील समान असले तर अशा वेळी उमेदवाराचा संबधित पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

८. उमेदवारांने एकापेक्षा जास्त पदाकरीता अर्ज सादर करायचा असल्यास, प्रत्येक पदाकरीता स्वतंत्रपणे अर्ज व स्वतंत्र धनाकर्ष सादर करावा. परंतु वेळप्रसंगी एकाच वेळी मुलाखत/परीक्षा घेतली गेल्यास कोणत्या तरी एका पदाकरीता उपस्थित रहावे लागेल. ज्यास उपस्थित राहील, त्या पदाकरीता संबंधित उमेदवार ग्राहय धरुन, दुसऱ्या पदाकरीता गैरहजर ग्राहय धरण्यात येईल.

९. निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, भरती प्रक्रियेची माहिती मा.शासनाच्या www.nrhm.maharashtra.gov.in , https://nhm.maharashtra.gov.in/ व www.arogya.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारासोबत केला जाणार नाही.

१०. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात आणून प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.

११. भरतीप्रक्रिया स्थगीत करणे, रद्द करणे, पदभरती प्रक्रियेत बदल करणे, पदांच्या संख्येत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्त, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांच्या स्तरावर राखून ठेवण्यात आले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१२. सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई यांचे दि.२५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयानुसार अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास पदासाठी कमाल वयोमर्यादा

अ) अराखीव प्रर्वगासाठी ३८ वर्ष

ब) राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील.

क) वैदयकीय अधिकारी एम.बी.बी.एस., विशेषतज्ञ व अतिविशेषतज्ञ यांची कमाल वयोमर्यादा ७० वर्ष राहील. व वय वर्ष ६० पेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडून शारीरिक दृष्ट्या सक्षम असल्याचे अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१३. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम केलेल्या अथवा करीत असलेल्या उमेदवारांना ५ वर्ष वयोमर्यादा शिथील राहील.

१४. सहसंचालक (अतांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांचे दि.२०/०७/२०१६ रोजीच्या पत्र क्र.राआसो/मनुष्यबळ/आरक्षण/२४५६४-७७४/१६ नुसार आवश्यक असणाऱ्या आरक्षित सवंगातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या इतर संवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

१५. केंद्र/राज्य शासनाने संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ

समाप्त करण्यात येईल.

१६. सदरची भरती प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील मेरीट मधील पुढील उमेदवारास नवीन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. सदर प्रतिक्षा यादी हि वेबसाईटवर प्रसिध्द झालेनंतर पुढील एक वर्षापर्यंत वैध राहील.

१७. ज्या पदाकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरिता पात्र उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्याची महानगरपालिका स्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल. सदर कौशल्य चाचणीमध्ये सदर उमेदवार पात्र ठरल्यास त्यास नियुक्ती आदेश देण्यात येतील, अन्यथा देण्यात येणार नाही.

१८. अर्जासोबत नमुद करण्यात येत असलेला मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी हा संपुर्ण पदभरती प्रक्रिया होईपर्यंत चालू स्थितीत राहण्याची दक्षता उमेदवारांनी घेण्यात यावी.

१९. अ) पदभरती प्रक्रियेकरिता प्रत्येक अर्जाकरिता अराखीव प्रवर्गातील उमेदवारांकरिता रु. १५०/- (अक्षरी रक्कम रु. एकशे पन्नास फक्त) व राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.१००/- (अक्षरी रक्कम रु. शंभर रुपये फक्त) चा धनाकर्ष (Demand Draft) जोडणे आवश्यक आहे.

ब) सदरचे शुल्क हे नापरतावा (Non-Refundable) असुन सदरचा (Demand Draft) Integrated Health and Family Welfare Society Sangli, Sangli Miraj and Kupwad City Corporation या संपुर्ण नावाने असावा.

क) DD (Demand Draft) हा अर्जावर एकदम वरच्या बाजूस जोडण्यात यावा.

ड) डिमांड ड्राफ्टच्या मागील बाजूस उमेदवाराने त्याचे संपुर्ण नाव, अर्ज सादर केलेल्या पदाचे नाव, जाहिरातीमधील पद क्रमांक व मोबाईल क्रमांक लिहावा.

इ) डिमांड ड्राफ्टच्या नावामध्ये चुक आढळल्यास अथवा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) खराब असल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज पदभरतीच्या पुढील प्रक्रियेकरिता ग्राहय धरला जाणार नाही, याची उमेदवारांनी काळजीपुर्वक नोंद घेण्यात यावी.

ई) धनाकर्ष (Demand Draft) राष्ट्रीयकृत बँकेचा आसावा.

२०. संवर्ग पदांकरिता उमेदवारांनी अर्ज सादर करताना आवश्यक कागदपत्रे

१) प्रथम विहित नमुन्यात अर्ज.

२) १० वी गुणपत्रक आणि सनद (जन्म तारीख पुरावा म्हणून).

३) १२वी गुणपत्रक आणि सनद.

४) पदवीचे गुणपत्रक (१ ले वर्ष ते अंतिम वर्ष-सर्व Attempt सह- जेणेकरुन एकत्रित गुण काढणे शक्य होईल) व पदवी प्रमाणपत्र (Convocation Certificate)

५) ज्या-त्या शैक्षणिक अर्हतेस/तांत्रीक पदांकरीता संबंधित परिषदेकडील नोंदणी लागू आहे त्या त्या शैक्षणिक अर्हतेची वैद्य असलेली परिषदेकडील तत्सम कौंन्सीलचे नोंदणी प्रमाणपत्र बंधनकारक राहील अन्यथा अपात्र ठरविण्यात येईल.

६) पासपोर्ट आकाराचे दोन फोटो.

७) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र.

८) राखीव संवर्गातील उमेदवारांनी जात प्रमाणपत्र.

९) अनुभव असलेस प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे.

१०) शासकीय अनुभव असलेस अनुभव दाखला.

११) वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र.

१२) वयाचा पुरावा म्हणून (शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला).

१३) नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ज ॲफिडेव्हिट जोडणे बंधनकारक राहील.

व इतर आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकीत/स्वसाक्षांकीत) करुन

जोडावीत. अर्ज सादर केल्याची पोहोच घेणेकरिता अर्जाची वरील पृष्ठभागाची झेरॉक्स घेऊन येणे.

२१. आयुष्यमान आरोग्य मंदिरासाठी (UHWC) मंजुर पदानुसार भरती प्रक्रिया करून निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. सदर निवड यादीमधील उमेदवारांना ज्या-ज्या प्रमाणे आयुष्यमान आरोग्य मंदिर (UHWC) कार्यान्वित होतील त्या-त्या प्रमाणे गुणानुक्रमाणे नियुक्ती आदेश देण्यात येतील.

२२. **शासन मार्गदर्शक सुचनेनुसार M.B.B.S. पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झालेस आयुष्यमान आरोग्य मंदिराकरिता वैदयकीय अधिकारी म्हणुन M.B.B.S. पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ६ ते ११ महिन्याकरीता B.A.M.S. पदवीधारक उमेदवारास वैदयकीय अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरुपार नियुक्ती देण्यात येईल.**

२३. **शासन मार्गदर्शक सुचनेनुसार B.A.M.S. पदवीधारक वैदयकीय अधिकारी पदाकरीता केंद्रशासनाच्या CPHC च्या मार्गदर्शक सुचनानुसार रुपये २५०००/- अधिक रुपये १५०००/- (PBI Performance Based Insentive कामावर आधारीत मोबदला) याप्रमाणे प्रति महिना महत्तम रुपये ४००००/- मानधन मार्गदर्शक सुचनांनुसार अदा करण्यात येईल.**

२४. उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग), बँकेचे नाव व डिमांड ड्राफ्ट क्रमांक अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.

२५. अर्ज सादर करणेकामी व मुलाखतीकरिता उपस्थित उमेदवारांना प्रवास भत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही. तसेच भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या वेळी उमेदवारांनी बोलविण्यात येईल त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरिता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

२६. पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी व विषेततज्ञ पदासाठी सुचना-पुर्णवेळ वैदयकीय अधिकारी व विशेषतज्ञ या पदासाठी अर्ज उपलब्ध न झालेस प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिस-या शुक्रवारी नियमितपणे सदरील मुलाखती घेणेत येतील. तसेच सदर दिवशी सुट्टी असल्यास मागील दिवशी (गुरुवारी) मुलाखती घेणेत येतील. सदर पदांसाठी पात्र इच्छूक उमेदवारांनी आपले अर्ज व प्रमाणपत्राच्या मूळ प्रती व सांक्षाकीत केलेल्या छायांकीत प्रतीसह थेट मुलाखतीसाठी नमुद दिवशी उपस्थित रहावे याची नोंद घ्यावी.

२७. राष्ट्रीय आरोग्य अभियान मधील सर्व स्तरावरील पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असल्याने व सद्यस्थितीत बदलीबाबत कोणतेही धोरण नसल्याने उमेदवारांस नियुक्ती दिल्यानंतर पदस्थापनेत बदल करुन दिला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अर्जदाराला कंत्राटी नियुक्ती कालावधीत त्यांचे सोयीनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

२८. मागासवर्गीय उमेदवारानी अर्ज आरक्षणामधून सादर करावयाचा असल्यास अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. कंत्राटी स्वरुपाची पदे असल्याने जात वैद्यता प्रमाणपत्राची (Caste Validity) आवश्यकता नाही.

२९. उमेदवाराने अर्ज सादर केलेल्या पदांशी निगडीत संबंधित उमेदवारास अनुभव असल्यास सदरील अनुभव ग्राहय धरण्यात येऊन त्याबाबचे नियमावलीनुसार गुण देण्यात येतील यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी. इतर क्षेत्रातील सदर पदाशी निगडीत नसलेला अनुभव असल्यास सदरील अनुभव हा ग्राहय धरला जाणार नाही यांची उमेदवारांनी नोंद घेण्यात यावी.

३०. अर्जाचा नमुना हा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

३१. उमेदवारांकडून अर्धवट, अपुर्ण, वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केले गेला असल्याने, संबंधित उमेदवारांचा अर्ज नाकारला गेल्यास, अथवा अपात्र ठरला गेल्यास त्याबाबतची सर्वस्वी व संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार स्विकारली जाणार नाही. अर्ज भरणेकामी काही अडचणी असल्यास कार्यालयास समक्ष भेट देऊन विचारणा करण्यात यावी.

३२. उमेदवारांनी वर नमुद केलेल्या कालावधीमध्ये, कार्यालयीन दिवशी, दिलेल्या वेळेत व्यक्तीश: उपस्थित राहुन अर्ज सादर करण्यात यावेत. नमुद मुदती अगोदर अथवा मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याबाबत उमेदवारांकडून कोणत्याही स्वरुपाची तक्रार अथवा कोणताही दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये.

३३. उमेदवारांची निवड पुर्ण करण्याआधी उमेदवारांना बोलावून त्यांचे अर्जाशी निगडीत सर्व मुळ कागदपत्राची पडताळणी करण्यात येईल. त्यावेळी उमेदवारांनी सदर मुळ (Original) कागदपत्र, जाहिरातीसोबत जोडलेले लहान कुटूंबांचे नमुना-अ प्रपत्र इ. कागदपत्र पडताळणी समितीसमोर सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

३४. मुलाखतीनंतर निवड झालेल्या उमेदवारांना पदावर रुजू होताना करारपत्रातील अटी मान्य करून तसा करारनामा रु. १००/- च्या मुद्रांकांवर दयावा लागेल.

३५. मा.शासन मार्गदर्शक सुचनेनुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमानुसार अधिक तम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. सदर यादीबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरिता २ दिवसाची मुदत देण्यात येईल व आक्षेपसोबत त्याच्या पुष्ठीर्थ योग्य पुरावे सादर करणेस सुचित करण्यात येईल.

सही/-

**आयुक्त तथा अध्यक्ष निवड समिती**

सांगली मिरज कुपवाड शहर

महानगरपालिका

कंत्राटी पदाकरिता कार्यालयीन अर्जाचा नमुना

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, वैदयकीय आरोग्य अधिकारी, सांमिकु, मनपा

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्र: -

| पासपोर्ट आकाराचा अलीकडील छायाचित्र स्वत: साक्षांकित करुन लावावा. |
|---|

प्रति,
मा.वैदयकीय आरोग्य अधिकारी,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, सांगली.

पदाचे नाव: ______________________________
कामाचे ठिकाण: आरोग्य मंदिर UPHC/UHWC/UCHC__________________

पद स्थापना कार्यक्षेत्र: **राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, सांगली.**

१) उमेदवारांचे संपुर्ण नाव:- ______________________________

२) उमेदवारांच्या वडिलांचे संपुर्ण नाव:- ______________________________

३) जन्म तारीख:- ____________ वर्ष:-________ महिना:-________ दिवस:-________

अक्षरी: ______________________________
______________________________

वय:- ______ वर्ष पुर्ण, ______ महिने, ______ दिवस

(जाहिरात प्रसिध्द झाले त्या दिवशी)

४) राहण्याचा पत्ता:- ______________________________
______________________________
______________________________

(मोबाईल क्र.:- ____________________ ) (नमुद करणे अनिवार्य)

(ई मेल ID.:- ____________________ )

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे:- होय/नाही

६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे:- होय/नाही जातीचा प्रवर्ग:- ____________

जातीचे नाव:- ____________

- अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग:- ____________

(नमुद करणे अनिवार्य)

७) धनाकर्ष क्रमांक व दिनांक व रक्कम:- ____________________

८) अर्जदार विवाहित आहे किंवा नाही:- आहे/नाही

९) शैक्षणिक पात्रता:-

| धारण केलेली पदवी अर्हतेचा तपशील (सर्व) | बोर्ड/विदयापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अनुभव:- अनुभव खालील तक्त्यामध्ये नमुद करुन सोबत साक्षांकित प्रत जोडावी.

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयांचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) अर्जासोबत खालील साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रमांक नमुद करावा)

१) ___________________________ २)___________________________

३)___________________________ ४)___________________________

५)___________________________ ६)___________________________

७)___________________________ ८)___________________________

९) ___________________________ १०) ________________________

१२) वरील नमूद केलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी असे ही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असून त्या मला मान्य आहेत.

ठिकाण:- सांगली स्वाक्षरी:________________________

दिनांक:- / /२०२५ अर्जदारांचे नांव:-__________________

# लहान कुटूबांचे प्रमाणपत्र-नमुना

श्री/श्रीमती/कुमारी ______________________________

श्री ______________________________ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी

वय __________ वर्ष, राहणार ______________________________ याव्दारे पुढील प्रमाणे

असे जाहीर करतो/करते की,

१. मी ______________________________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला _______ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै,२०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ________ इतकी आहे (असल्यास जन्म दिनांक १) / / २) / / )

३. दिनांक २३ जुलै,२०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै,२०२० व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे शासकीय नियमानुसार मी या पदासाठी अपात्र ठरेल यांची मला जाणीव आहे.

ठिकाण: __________ अर्जदाराची स्वाक्षरी: __________

दिनांक: / /२०२५ अर्जदाराचे नाव: __________

---

# फौजदारी गुन्हा दाखल नसले बाबतचे हमीपत्र

मी श्री/श्रीमती/कुमारी ______________________________

वय _______ वर्ष, सध्या राहणार ______________________________

______________________________ असे लिहुन देते/देतो की, या पत्यावर ________ वर्षापासून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमुद कालावधीत माझेविरुध्द मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या आभिलेखावर काहीएक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

सही/-

ठिकाण:- __________

दिनांक: / /२०२५